डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# कृषि विज्ञान केंद्र

वाघापूर रोड, यवतमाळ - ४४५ ००१ (महाराष्ट्र)

E-Mail - pckvkytl@yahoo.co.in

ICAR

जाक्र/कृविकें, यवतमाळ/दरपत्रक मागणी पत्रक/77 /२०२५
कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ
दि. २९/०४/२०२५

## दरपत्रक मागणी पत्र

प्रति,
श्री ..................................

..................................

..................................

**विषय** : भोजन, नास्ता व चहा कॉफी चे दर पुरविणेबाबत ..........

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, २०२५–२६ या चालू आर्थिक वर्षासाठी कृषि विज्ञान केंद्र यवतमाळ येथे प्रक्षेत्रावर तसेच दत्तक व इतर गावी विविध विषयावर सर्व विषय विषेतज्ञांकडून १ ते ७ दिवसीय कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रम, प्रथम रेषिय प्रात्यक्षिक तसेच चाचणी प्रयोग, व इतर विस्तार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येतील . या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थींना चहा, नास्ता व भोजन पुरविण्यासाठी आपणाकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सदर दरपत्रके दि. 08/05/२०२५ पर्यंत पाठविण्यात यावे. त्यानंतर मिळालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

| अ क्र. | विवरण | तपशिल | शिफारस केलेल दर | दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | यवतमाळ शहरा मध्ये | यवतमाळ शहरा बाहेर |
| १ | चहा व RO water | | रु.०७/प्रति कप | रु प्रति कप | रु /प्रति कप |
| २ | कॉफी व RO water | | रु.१०/प्रति कप | रु /प्रति कप | रु प्रति कप |
| ३ | नास्ता | समोसा, कचोरी, मुंगवडा, पोहे, उपमा इत्यादीपैकी कोणतेही एक RO water | रु.२०/प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट | रु प्रति प्लेट |
| ४ | मर्यादीत जेवण | भाकर, भरीत, पिठल आणि ठेचा / पुऱ्या भाजी /मसाले भात व कढी या चैकी कोणतेही एक RO water | रु.४५/प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट | रु प्रति प्लेट |
| ५ | साधे जेवण | वरण, भात, एक भाजी, पोळया, लोणचे, हिरवी चटणी, सलाद RO water | रु.६०/प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट |
| ६ | पौष्टीक तृणधान्य थाली | ज्वारी भाकरी, बाजरीची खिचडी, नाचणीचा शिरा, एक सुकी भाजी, एक रस्सा भाजी, पापड, लोणचे, हिरवी चटणी, कढी RO water | रु.९०/प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट |
| ७ | स्पेशल जेवण | वरण, भात, एक सुकी भाजी, एक रस्सा भाजी, पोळया, पापड, लोणचे, हिरवी चटणी, सलाद, स्वीट | रु.१००/प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट |
| ८ | डिलक्स जेवण | पोळया, एक सुकी भाजी, एक रस्सा भाजी, जिरा राईस, पापड, लोणचे, हिरवी चटणी, कढी किंवा मठ्ठा पैकी एक<br>दह्यातील कोशिंबीर / साधे सलाद पैकी एक फरसाण किंवा भजे<br>मिठाई मध्ये गुलाबजाम, श्रीखंड, बुंदीचा लाडु, जिलेबी किवा आमरस पैकी एक RO water | रु.१४०/प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट |
| ९ | सुपर डिलक्स जेवण | स्टार्टर, सुप कोणतेही एक RO water<br>पनीरची भाजी वेज कढाई, वेज हंडी, वेज, काल्हापुरी, तवा भाजी, पैकी कोणतेही एक भाजी<br>दाल फ्राय/तडका जिरा राईस किंवा वेज पुलाव<br>चपाती बटर रोटी, बटर पराठा, बटर नान, पालक पुरीए पोळया पैकी कोणतेही एक<br>मिठाई गुलाबजाम, रसगुल्ला, मुगदाळीचा हलवा, गाजर हलवा, आईस क्रीम पैकी कोणतेही एक<br>सलाद पापड फरसाण किंवा भजे .मुखवास | रु.२५०/प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट | रु /प्रति प्लेट |

## सुचना व अटी :

- दरपत्रके वर दिलेल्या वेळेतच सादर करावी, उशीरा मिळालेली दरपत्रके स्वीकारली जाणर नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.
- दरपत्रके बंद लिफाफ्या मध्येच पाठवुन लिफाफ्यावर **कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ कार्यक्रमा साठी चहा, नास्ता, भोजनाकरीता दरपत्रक** असे ठळक अक्षरात लिहावे. तसेच दरपत्रक दि. 08/05/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० पर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवाव्यात. त्यानंतर आलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
- दि.09/05/२०२५ ला सकाळी ११.०० वाजता वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख, कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ यांच्या दालनात कार्यालयीन अधिकारी समिती आणि पुरवठाधारकांच्या समक्ष प्राप्त दरपत्रकें उघडण्यात येतील. तरी ज्या दरपत्रके पुरवठाधारकांनी सदर वेळेत हजर राहावे याची नोंद घ्यावी.
- **अन्न व सुरक्षा मानदे कायदा २००६ अंतर्गत परवाना ( Licence under Food Safety & Standards Act 2006) असणे आवश्यक**
- GST क्रमांकासहीत देयके असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.
- सदर मागणीपत्रात बाजारभावाची चौकशी करून शिफरस केलेले दर नमुद करण्यात आलेले आहेत. पुरवठाधारकांचे दर त्यापेक्षा कमी असावेत.
- ज्या पुरवठाधारकाचे दरपत्रक सर्वात कमी दराचे असेल अशा पुरवठाधारकाचे दरपत्रक मंजूर करण्यात येईल. जर दोन पुरवठाधारकाचे दर सारखे असल्यास ईश्वर चिठ्ठीने नाव काढण्यात येईल.
- यानंतर ज्या पुरवठाधरकाचे दरपत्रक मंजुर होईल अशा पुरवठाधारकाला वेळोवळी कार्यक्रमाच्या आवश्यकतेनुसार चहा, कॉफी, नाश्ता व भोजन पुरवावे लागेल.
- दरपत्रक मंजूर / पारित पुरवठाधारकाला चहा, नास्ता, पाणी व भोजन वाढण्याची जबाबदारी दरपत्रक मंजूर / पारित पुरवठाधारकाची राहील. तसेच यवतमाळ जिल्हात जिथे कुठे कार्यक्रम असतील तिथे कार्यक्रमाच्या आवश्यकतेनुसार चहा, नास्ता, पाणी व भोजन पुरवणे बंधनकारक राहिल.
- सदर दरपत्रकात चहा, नास्ता, व भोजनाचे नमूद केलेले दर पुढील एका वर्षासाठी ग्राहय धरण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.
- सर्व प्रकारचे जेवण पोटभरुन द्यावे लागेल.

आपला विश्वासू,

वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ

Scanned with OKEN Scanner